## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर- १८७१-अ/२०२६**

**अपिल क्रमांक : के.आर- १८७४-अ/२०२६**

**अपिल क्रमांक : के.आर- १८७६-अ/२०२६**

**अपिल क्रमांक : के.आर- १८७८-अ/२०२६**

**अपिल क्रमांक : के.आर- १८८१-अ/२०२६**

**अपिलार्थी, श्री.मनोज चांदवानी**

४०१, जिगर पॅलेस को.ऑ.हौ.सोसायटी लि.,
चिकणघर रोड, कल्याण (प.), ता.कल्याण,
जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, चांदीबाई हिमतमल मनसुखानी (सी.एच.एम) कॉलेज, पी.बी.नं.१७, रेल्वे स्टेशन समोर, उल्हासनगर ३ जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, चांदीबाई हिमतमल मनसुखानी (सी.एच.एम) कॉलेज, पी.बी.नं.१७, रेल्वे स्टेशन समोर, उल्हासनगर ३ जि.ठाणे ४२१ ००३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०९.२०२६**

| अ. क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | के.आर- १८७१अ/२०२६ | २१.०१.२०२६ | -- | २६.०२.२०२६ | -- |
| २ | के.आर- १८७४अ/२०२६ | २१.०१.२०२६ | -- | २६.०२.२०२६ | -- |
| ३ | के.आर- १८७६अ/२०२६ | २८.०१.२०२६ | -- | १८.०२.२०२६ | -- |
| ४ | के.आर- १८७८अ/२०२६ | २१.०१.२०२६ | -- | १८.०२.२०२६ | -- |
| ५ | के.आर- १८८१अ/२०२६ | ११.१२.२०२५ | -- | १६.०२.२०२६ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०८.०५.२०२६ रोजीच्या पाच अर्जान्वये त्यांना माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केले आहेत. सदर द्वितीय अपिलांवर आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). जन माहिती अधिकारी श्री.शशिभाल पाण्डेय, प्रोफेसर, चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ पाच अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

| अ. क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा विषय |
|---|---|---|
| १ | के.आर- १८७१अ/२०२६ | Action Taken Report (ATR) on my above mentioned letter, detailing the action taken at each stage. Certificate copies of all file notings, remarks and endorsements made by the principal or any other authority on my said letter. |

| | | |
|---|---|---|
| २ | के.आर- १८७४अ/२०२६ | Seeking certified copies of inward and outward registers of General Office/Principal Office//registrar office. |
| ३ | के.आर- १८७६अ/२०२६ | Seeking action Taken Report on my email dated १५ May २०२१ adressed to the Principal. |
| ४ | के.आर- १८७८अ/२०२६ | Seeking information regarding action taken on my letter dated ३० september २०२५ (Inword NO.२६९०). |
| ५ | के.आर- १८८१अ/२०२६ | Request for certificed copies of personal file record and duplicate service book of Manoj Chandwani retired Senior Cleark. |

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना या पाचही प्रकरणांमध्ये त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती विनामुल्य पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना द्वितीय अपील क्रमांक के.आर- १८७१अ/२०२६, के.आर- १८७४अ/२०२६, के.आर- १८७६अ/२०२६, के.आर- १८७८अ/२०२६, के.आर- १८८१अ/२०२६ या पाचही प्रकरणांमध्ये त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर- १८७१अ/२०२६, के.आर- १८७४अ/२०२६, के.आर- १८७६अ/२०२६, के.आर- १८७८अ/२०२६, के.आर- १८८१अ/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६ .